नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १७१ Issue - 171 | वार सोमवार दि. १० नोव्हेंबर २०२५ Blow- Monday Date 10 November 2025 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

# नंदुरबारमध्ये स्कुल बस १५० फूट खोल दरीत कोसळली, दोन चिमुकल्यांचा मृत्यू

## ५६ जणांना घेऊन जाणारी बस दर कोसळली; १८ जखमी, पालकांचा आक्रोश




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नंदुरबार : आश्रम शाळेला सुट्टी लागल्याने गावाकडे आलेल्या विद्यार्थ्यांना शाळेत घेऊन जात असलेल्या खाजगी बस मोलगी अक्कलकुवा दरम्यान असलेल्या आम लीबारी जवळ घाटातील दरीत १५० फूट कोसळून भीषण अपघात घडला. या अपघातात दोन विद्यार्थ्यांचा जागीच मृत्यू झाला. तर १८ जण जखमी आहेत. पैकी दोन जणांची प्रकृती चिंताजनक आहे. या बसम ध्ये ५६ प्रवासी असल्याची माहिती मिळाली आहे.या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

चाळीसगाव तालुक्यातील म हुणबारे येथील अनुदानित आदिवासी आश्रम शाळेत अक्कलकुवा तालुक्यातील मोलगी परिसरातील विविध गावातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दिवाळीची सुट्टी असल्याने विद्यार्थी गावाकडे आले होते. सुट्टी संपल्याने अतिदुर्गम भागातील सातपूडा परिसरातील आदिवासी विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी खाजगी स्कूल बस (क्र.एम. एच. १५, ए.के, १४५९) ही मोलगी अक्कलकुवा दरम्यान आमलीबारी जवळ असलेल्या घाटातील दरीत १५० फूट खोल दरीत कोसळल्याची घटना ९ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजे दरम्यान घडली.

यावेळी बसमध्ये विद्यार्थ्यांसह एक शिक्षक एक परिचर असे ५६ जण असल्याची माहिती सूत्रानुसार प्राप्त झाली आहे. जखमी विद्यार्थ्यांना तातडीने अक्कलकुवा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. वैद्यकीय अधीक्षक डॉ. गणेश पवार आणि कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांवर योग्य उपचार केले असता यापैकी १८ जखमी विद्यार्थ्यांना नंदुरबार येथील जिल्हा रुग्णालयात संदर्भ सेवेसाठी तातडीने रवाना करण्यात आले. या १८ पैकी दोन विद्यार्थी गंभीर जखमी असल्याचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. पवार यांनी सांगितले.

या अपघातात जगदीश बहादूसिंग वळवी (वय ७ वर्ष रा.निंबिपाडा) आणि कपिला जहांगिर राऊत ( वय १३ वर्ष, रा.काठी) हे दोन विद्यार्थी मृत्युमुखी पडले. यात जयश्री केशव वसावे, अत्तर सिंग मुंग्या वसावे, रिना अत्तेसिंग वसावे, अर्जून दिल्या वसावे, अनमोल राया वसावे, ऊर्मिला दिनेश तडवी, शिल्पा मंगलसिंग वळवी, आर्या सुरसिंग वळवी, अजित सागर वळवी, संदिप अभिजीत वळवी, अर्थव विलास तडवी, माया रोत्या वसावे, सोनी दिरवा वळवी, हिना बहादूरसिंग वळवी, रसिला बिलाड्या वसावे, सचिन रामसिंग चौधरी, यशवंता विलास वळवी, करिना सुऱ्या वळवी, संदिप बिज्या तडवी, रूषा वळवी हे विद्यार्थी जखमी झाले. विद्यार्थ्यांना नंदुरबार येथे संदर्भ सेवेसाठी तातडीने हलवण्यात आले यापैकी दोन विद्यार्थ्यांची स्थिती गंभीर आहे.

अपघाताचीमाहिती मिळताच घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी सुभाष भोये आपल्या फौजफाट्यासह पोहोचले. यावेळी जखमींचे बचाव कार्य करण्यासाठी भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष नागेश पाडवी, माजी जिल्हा परिषद सदस्य किरसिंग वसावे, प्रताप वसावे, नितेश वळवी, अनिल पाडवी, माजी जिल्हा परिषद सभापती शंकर पाडवी, रोहित चौधरी, रवी पाडवी, जयवंत पाडवी यांनी बचावकार्य केले. खाजगी वाहने आणि रूग्णवाहिकेने जखमींना अक्कलकुवा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.

अपघाताचीमाहिती मिळाल्यानंतर अक्कलकुवा ग्रामीण रुग्णालयात पालकांनी एकच गर्दी करून विद्यार्थ्यांच्या पालकांनी आक्रोश केला. घटना घडल्यानंतर लगेचच बस चालक तेथून फरार झाले. अद्याप त्यांना ताब्यात घेण्यात आलेले नाही. सातपुड्यातील शेकडो विद्यार्थ्यांना आमिष देऊन परजिल्ह्यातील संस्थाचालक खाजगी वाहनातून जनावरांचे कोंबून घेवून जात असल्याचे वेळोवेळी घडत आहे. याबाबत प्रशासनाने गांभीर्याने दखल न घेतल्याने आजचा हा अपघात होवून निष्पाप विद्यार्थ्यांचा बळी गेल्याचा आरोप पालकांनी केला आहे.

# देशात हल्ल्याची योजना; एटीएसकडून तीन इसिस दहशतवाद्यांना अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अहमदाबाद : गुजरात दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) अहमदाबाद येथील अडालज येथून दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असलेल्या तीन जणांना अटक केली आहे. एटीएस पथक गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर लक्ष ठेवून होते. एका गुप्त माहितीनंतर, एटीएसने आज (९ नोव्हेंबर) सकाळी तिघांना अटक केली. तपासात तिघेही आयसिससाठी काम करत असल्याचे समोर आलं आहे.

देशभरातील अनेक ठिकाणी हल्ला करण्याची योजना

एटीएसला माहिती मिळाली की दहशतवादी शस्त्रे गोळा करण्यासाठी गुजरातमध्ये येत आहेत आणि देशभरातील अनेक ठिकाणी हल्ले करण्याची योजना आखत आहेत. हे तिघे दहशतवादी दोन वेगवेगळ्या मॉड्यूलचा भाग आहेत. एटीएसच्या रडारवर असलेले दहशतवादी देशातील कोणत्या ठिकाणी हल्ला करण्याची योजना आखत आहेत हे शोधण्यासाठी तपास सुरू करण्यात आला आहे.

यापूर्वी, गुजरात एटीएसने ऑगस्टमध्ये चार दहशतवाद्यांना अटक केली होती. त्यापैकी दोघांना गुजरातमध्ये, एका दिल्लीत आणि एका नोएडामध्ये अटक करण्यात आली होती. हे चौघेही बनावट चलन रॅकेटमध्ये आणि लोकांना दहशतवादी संघटनांशी जोडण्यात सहभागी होते. ते असे ॲप्स वापरत होते जे आपोआप कंटेंट डिलीट करतात. हे चौघेही अल कायदाशी संलग्न असलेल्या अल कायदा इन द इंडियन सबकॉन्टिनेंट साठी काम करत होते. ते सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आणि संशयास्पद ॲप्सद्वारे लोकांशी संवाद साधत होते.

**शस्त्रे गोळा करण्यासाठी गुजरातमध्ये**

एटीएसच्या मते, आरोपी २० ते २५ वर्षांच्या दरम्यान आहेत आणि ते भारतात दहशतवादी हल्ल्यांचा कट रचत होते. या दहशतवाद्यांना विशिष्ट आणि संवेदनशील ठिकाणांना लक्ष्य करण्याचे निर्देश देण्यात आले होते. हे चारही दहशतवादी सोशल मीडिया ॲप्सद्वारे एकमेकांशी जोडलेले होते. तपासात असेही समोर आले आहे की ते सीमेपलीकडे असलेल्या दहशतवाद्यांच्या संपर्कात होते. गुजरात एटीएस आणि केंद्रीय एजन्सी आता त्यांचे नेटवर्क, निधी, प्रशिक्षण आणि परदेशी संपर्क उलगडण्यासाठी काम करत आहेत. त्यांच्या चौकशीनंतर आणखी अटक होण्याची शक्यता आहे.

# पुण्यात नरभक्षक बिबट्याचा थरार; स्वसंरक्षणासाठी महिलांच्या गळ्यात खिळ्यांचा पट्टा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुणे जिल्हा हा बिबट्या चा हॉटस्पॉट बनला असून त्याच्या दहशतीनं ग्रामस्थ भयभीत झालेले आहेत. आता या बिबट्यापासून स्वतःचं संरक्षण करण्यासाठी ग्रामस्थ वाटेल त्या उपाययोजना करत आहेत. शिरूर तालुक्यातील पिंपरखेड गावच्या महिलांनी आणि पुरुषांनी थेट गळ्यामध्ये टोकदार खिळे असलेला पट्टाच घातलाय. बिबट्या प्रामुख्याने मानेवर हल्ला करुन, नरडीचा घोट घेतो. अशा प्रसंगी शेतात राबताना बिबट्याने आपली शिकार करु नये, म्हणून महिलांनी टोकदार खिळे असलेला पट्टा गळ्यात घातल्याचं चित्र आहे.

शेती हेचं उपजीविकेचं साधन असल्याने, शेतात जाण्याविना या शेतकऱ्यांसमोर पर्याय नसतो. पण त्यावेळी बिबट्याच्या हल्ल्यातून जीव कसा वाचवायचा? असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकलाय. त्यावर पर्याय म्हणून जसं कुत्र्यांच्या गळ्यात खिळ्यांचे पट्टे घातले जातात, तसे पट्टे घालण्याचा निर्णय या बळीराजाने घेतला आहे.

आतापर्यंत बिबट्याच्या हल्ल्यात अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे बळीराजावर टोकदार खिळ्यांचे पट्टे परिधान करण्याची वेळ आली आहे आणि हे खरंच लाजिरवाण आहे. याबाबत बोलताना खासदार अमोल कोल्हे म्हणाले की, 'कबूतरांच्या बाबत मुख्यमंत्र्यांनी तात्काळ बैठक घेतली होती. पण इकडे बिबट्याने ५७ बळी घेतल्यानंतर सरकारला जाग आली. आम्हाला त्यासाठी रास्तारोको कराव लागलं. आमची मागणी आहे की बिबट्याचा हल्ला हा राज्य आपत्ती घोषित करावा. तसे जर केरळ सरकार घोषित करत असेल मग आपल्या मुख्यमंत्र्यांना काय अडचण आहे?'

**१३ वर्षीय रोहनचा बिबट्याने जीव घेतला**

शिरूर तालुक्यातील पिंपरखेड येथे नरभक्षक बिबट्या ला ठार करण्यात वन विभागाला यश आलं आहे. रात्री उशिरा गावामध्ये बिबट्याचा शोध घेत असताना वन विभागाला हा बिबट्या ड्रोनमध्ये दिसला. यामुळे सावध झालेल्या बिबट्याने थेट वनविभागाच्या कर्मचाऱ्यांवरती प्रतिहल्ला करण्याचा प्रयत्न केला. मग शेवटी दोन शार्प शूटरने या बिबट्यावर तीन राऊंड फायर केले, यात बिबट्या ठार झाला. ६ वर्ष वयाचा नर जातीचा हा नरभक्षक बिबट्या आहे. १३ वर्षीय रोहनचा जीव ज्या ठिकाणी घेतला तिथून ४०० मीटर अंतरावर या बिबट्याला ठार करण्यात आलं.

**शेतकऱ्यांबद्दल वादग्रस्त वक्तव्यावर विखे पाटलांचं स्पष्टीकरण**

# 'विखेंची गाडी फोडणाऱ्याला १ लाख बक्षीस देणार', बच्चू कडूंची घोषणा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अहिल्यानगर : राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण पाटील यांनी शेतकरी कर्जमाफीबाबत केलेल्या एका वक्तव्यामुळे नवा वाद निर्माण झाला. या वादानंतर प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांनी त्यांच्यावर सडकून टीका केली होती. तसेच शेतकरी वर्गातही नाराजी पसरली होती. आपल्या चुकीच्या वक्तव्याची जाणीव झाल्यानं राधाकृष्ण विखे पाटील यांनी वादग्रस्त वक्तव्यांवर आज अखेर स्पष्टीकरण दिलं आहे. त्यांनी आपल्या वक्तव्यावर सारवासारव केली आहे. आपला डीएनए शेतकऱ्याचा आहे. पण आता भाषण करायची पंचाईत झालीय, असं राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले आहेत.

मी परवा एका कार्यक्रमात गेलो होतो. तिथे मी काय भाषण केलं ते दाखवलंच नाही. दुसरंच दाखवलं. कर्ज काढा आणि माफीची मागणी करा, असं वक्तव्य केल्याचं दाखवलं. मी भाषणात काय म्हणालो होतो? आपण निवडणुका लढतोय. निवडणुका येताच सोसायटी काढतो. सोसायटी थकली की पुन्हा कर्जमाफीची मागणी करतो. भाषणाचा पुढचा जो मुद्दा आहे तो दाखवलाच नाही. आता बोलायची पंचायत झाली. यापुढे मी भाषणच करणार नाही, असं ठरवलं आहे. आपला डीएनए शेतकऱ्याचा आहे, अशा शब्दांत राधाकृष्ण विखे पाटील यांनी वादग्रस्त वक्तव्यावर आपली बाजू मांडली.

सोसायटी काढायची, कर्ज काढायचं आणि पुन्हा कर्जबाजारी व्हायचं. त्यानंतर पुन्हा कर्जमाफीची मागणी करायची. हे आपलं अनेक वर्ष काम चालू आहे. त्याची काही चिंता नाही. महायुती सरकारमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीरच केलं आहे, शंभर टक्के आम्ही शेतकऱ्याची कर्जमाफी करणार आहोत हे आम्ही जाहीरच केलेलं आहे, असं वक्तव्य राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलं होतं. त्यांच्या याच वक्तव्यावरुन वाद निर्माण झाला होता. आता त्यांनी आपल्या वक्तव्यावर सारवासारव केली आहे.

दरम्यान, राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वादग्रस्त वक्तव्यानंतर त्यांची गाडी फोडणाऱ्याला आपण एक लाख रुपये बक्षीस देणार, अशी घोषणा बच्चू कडू यांनी केली आहे. नाव राधाकृष्ण आणि कृत्य कंसासारखं करायचं. तर त्यांना पक्षातून हाकलून काढलं पाहिजे. एकीकडे देवेंद्र फडणवीस कर्जमाफीची तारीख देतात आणि हे वाचाळवीर मंत्री महोदय सांगतात की, कर्जमाफी कितीदा द्यायची. अरे लोकं तुम्हाला मारत नाही त्याबद्दल धन्यवाद माना. मी तर म्हणतो, जो राधाकृष्ण विखे पाटील यांची गाडी फोडेल त्याला १ लाखांचं बक्षीस देईन. मी तर फोडणारच आहे. पण ही नालायकी थांबवा. हे सहन करणार नाही, असं वक्तव्य बच्चू कडू यांनी केलं.

जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक




प्रचार साहित्य

अत्याधुनिक निवडणूक मोबाईल ॲप वापरा व हमखास निवडून या.

फक्त आमच्या कडेच



मतदार स्लिप नांव व मतदान केंद्रासहीत फक्त आमच्याकडेच मिळतील.

प्रचार साहित्य

१. डमी वोटिंग मशिन
२. झेंडे, टोपी,पंचा ३. बिल्ले
४. मतदार स्लिप ५.स्टिकर ६.पॉम्प्लेटस
७. स्लिप प्रिंटर ८. सॉफ्टवेअर
९. बॅचेस १०. एस.एम.एस./व्हाईस कॉल

नितीन कन्सलटन्सी

नितीन हलसगी

मो. 9595427070 / 9270325070

## संपादकीय....

### पालकांचा आक्रोश

आश्रम शाळेला सुट्टी लागल्याने गावाकडे आलेल्या विद्यार्थ्यांना शाळेत घेऊन जात असलेल्या खाजगी बस मोलगी अक्कलकुवा दरम्यान असलेल्या आमलीबारी जवळ घाटातील दरीत १५० फूट कोसळून भीषण अपघात घडला. या अपघातात दोन विद्यार्थ्यांचा जागीच मृत्यू झाला. तर १८ जण जखमी आहेत. पैकी दोन जणांची प्रकृती चिंताजनक आहे. या बसमध्ये ५६ प्रवासी असल्याची माहिती मिळाली आहे.या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. चाळीसगाव तालुक्यातील मेहुणबारे येथील अनुदानित आदिवासी आश्रम शाळेत अक्कलकुवा तालुक्यातील मोलगी परिसरातील विविध गावातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दिवाळीची सुट्टी असल्याने विद्यार्थी गावाकडे आले होते. सुट्टी संपल्याने अतिदुर्गम भागातील सातपूडा परिसरातील आदिवासी विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी खाजगी स्कूल बस (क्र.एम. एच. १५, ए.के, १४५९) ही मोलगी अक्कलकुवा दरम्यान आमलीबारी जवळ असलेल्या घाटातील दरीत १५० फूट खोल दरीत कोसळल्याची घटना ९ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजे दरम्यान घडली. यावेळी बसमध्ये विद्यार्थ्यांसह एक शिक्षक एक परिचर असे ५६ जण असल्याची माहिती सूत्रानुसार प्राप्त झाली आहे. जखमी विद्यार्थ्यांना तातडीने अक्कलकुवा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. वैद्यकीय अधीक्षक डॉ. गणेश पवार आणि कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांवर योग्य उपचार केले असता यापैकी १८ जखमी विद्यार्थ्यांना नंदुरबार येथील जिल्हा रुग्णालयात संदर्भ सेवेसाठी तातडीने रवाना करण्यात आले. या अपघातात जगदीश बहादूसिंग वळवी (वय ७ वर्ष रा.निंबिपाडा) आणि कपिला जहांगिर राऊत ( वय १३ वर्ष, रा.काठी) हे दोन विद्यार्थी मृत्युमुखी पडले. यात जयश्री केशव वसावे, अत्तर सिंग मुंग्या वसावे, रिना अत्तेसिंग वसावे, अर्जून दिल्या वसावे, अनमोल राया वसावे, ऊर्मिला दिनेश तडवी, शिल्पा मंगलसिंग वळवी, आर्या सुरसिंग वळवी, अजित सागर वळवी, संदिप अभिजीत वळवी, अर्थव विलास तडवी, माया रोत्या वसावे, सोनी दिरवा वळवी, हिना बहादूरसिंग वळवी, रसिला बिलाड्या वसावे, सचिन रामसिंग चौधरी, यशवंता विलास वळवी, करिना सुऱ्या वळवी, संदिप बिज्या तडवी, रूषा वळवी हे विद्यार्थी जखमी झाले. विद्यार्थ्यांना नंदुरबार येथे संदर्भ सेवेसाठी तातडीने हलवण्यात आले यापैकी दोन विद्यार्थ्यांची स्थिती गंभीर आहे. खाजगी वाहने आणि रूग्णवाहिकेने जखमींना अक्कलकुवा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. अपघाताचीमाहिती मिळाल्यानंतर अक्कलकुवा ग्रामीण रुग्णालयात पालकांनी एकच गर्दी करून विद्यार्थ्यांच्या पालकांनी आक्रोश केला.

# विश्वाला मार्गदर्शन करणारा भारत घडविण्यासाठी 'वंदे मातरम्'चा संकल्प करूया : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : जात, पंथ, धर्म, भाषांचे भेद विसरून स्वातंत्र्यलढ्यात सर्वांनी 'वंदे मातरम्' म्हटले होते. वंदे मातरम् हा स्वातंत्र्यलढ्याचा परवलीचा शब्द होता आणि क्रांतिकारकांचे घोषवाक्यही याच गीतातून तयार झाले. विश्वाला मार्गदर्शन करणारा भारत घडवण्यासाठी राष्ट्रभक्ती आणि एकात्मता आवश्यक आहे. यासाठी 'वंदे मातरम्'च्या सामूहिक गायनाने संकल्प करूया, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सामूहिक 'वंदे मातरम्' गीत गायनप्रसंगी केले.



मंत्रालयात वंदे मातरम् गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग आणि सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आयोजित सामूहिक 'वंदे मातरम्' गायनाचा कार्यक्रम मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, कौशल्य विकास, रोजगार, नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव राजेश कुमार, पद्मश्री पद्मजा फेणानी-जोगळेकर यांच्यासह मंत्रालयातील वरिष्ठ सनदी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

पद्मजा फेणानी-जोगळेकर यांच्यासोबत सर्व मान्यवरांनी एकत्र येऊन वंदे मातरमचे गायन करत राष्ट्रभावना दृढ करण्याचा संकल्प व्यक्त केला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वंदे मातरम् हे केवळ गीत नाही, तर देशाला जोडणारी, एकसंध ठेवणारी भावना आहे. कोलकाताच्या टाउन हॉलमध्ये ३० हजारपेक्षा अधिक जनता जमली होती. त्याठिकाणी पहिल्यांदा वंदे मातरमची पहिली घोषणा झाली. त्याला प्रतिसाद देत ३० हजार लोकांनी सामूहिक वंदे मातरमचा जयघोष केला. त्यानंतर वंग-भंग चळवळीच्यावेळी प्रेरणा गीत, संघर्ष गीत झाले. त्या दिवसापासून सगळीकडे, इंग्रजांच्याविरुद्ध 'वंदे मातरम्' म्हणत लढा सुरू झाला. प्रभात फेऱ्या, कार्यक्रमांमध्ये, आंदोलनामध्ये हल्ला केला तरी 'वंदे मातरम्' गायिले जात होते. काँग्रेसच्या अधिवेशनात रविंद्रनाथ टागोरांनी वंदे मातरम् गायिले. यानंतर जात, धर्म, पंथ सगळे विभाजन विसरून संपूर्ण भारतीय समाज एकत्र येऊन वंदे मातरम् चे घोषवाक्य तयार झाले. तेव्हापासून हे एक प्रकारे राष्ट्रगीत म्हणून 'वंदे मातरम्' तयार झाले.

स्वातंत्र्यसंग्राम सेनानी फाशीवर जातानाही 'वंदे मातरम्' म्हणायचे. अहिंसेतून आपल्याला स्वातंत्र्य प्राप्त करायचं आहे, असे म्हणणाऱ्या नेत्यांचे 'वंदे मातरम्' घोषवाक्य झाले. स्वातंत्र्याच्या परवलीचा शब्द तयार झाला. स्वातंत्र्य लढ्यामध्ये मोलाचे योगदान वंदे मातरम् ने दिले. स्वतंत्र भारताचा झेंडा तयार करतानाही त्यावर वंदे मातरम् लिहिण्यात आले. महात्मा गांधी आपल्या प्रत्येक पत्राचा समारोप हा वंदे मातरम् ने करीत. भारताच्या संविधानाच्या निर्मितीनंतर जन गण मन आणि वंदे मातरम् या दोन्ही गीतांना राष्ट्रगीताचा दर्जा देऊन समान सन्मान दिला, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

१५० वर्ष झाली तरी, आजही वंदे मातरम् ने एक प्रकारे आपल्या भारताला दिशा देणारे गीत आहे. गीतामध्ये आपल्या मातृभूमीचं वर्णन केलेलं आहे. स्वातंत्र्य लढ्यामध्ये जाती, पंथ, धर्म, भाषा सगळे भेद विसरून प्रत्येकाने वंदे मातरम् म्हटले. वंदे मातरम् हे

### मंत्रालयात सामूहिक 'वंदे मातरम्' गीताचे गायन

कुठल्याही एका धर्माचे गीत नाही. सर्व धर्मांना प्रेरणा देणारे प्रेरणागीत, राष्ट्रगीत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण देशभरात वंदे मातरम् सामूहिक गायनाचा कार्यक्रम हाती घेतला तर राज्यामध्येही मंत्री मंगल प्रभात लोढा यांनीही संकल्पना मांडली. यामुळे राज्याच्या प्रत्येक भागामध्ये, प्रत्येक शाळेमध्ये सामुहिक वंदे मातरम् चा कार्यक्रम होत आहे. गीताची भावना प्रत्येक तरुण, विद्यार्थी, नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यभर वंदे मातरम् होत आहे. १९०५ साली वंगभंगच्या वेळी आणि स्वातंत्र्य मिळताना जी भावना तयार झाली, तीच भावना संपूर्ण भारतामध्ये तयार करण्याचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. प्रधानमंत्री मोदी यांचे एक विकसित भारताचे स्वप्न आहे. भारतामध्ये 'विकास भी और विरासत भी', अशा प्रकारची भावना त्यांनी मांडली आहे. विश्वाला मार्गदर्शन करणारा भारत, नालंदा आणि तक्षशिलासारख्या विश्वविद्यालयाच्या माध्यमातून जगाला ज्ञान देणारा भारत, भगवान गौतम बुद्धांचे तत्वज्ञान संपूर्ण विश्वात नेणारा भारत घडविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

**क्रांतीकारकांना प्रेरणा देणारे समरगीत- मंत्री आशिष शेलार**

वंदे मातरम् गीताचे संपूर्ण देशभर गायन होत आहे. या गीताने स्फुरण येते. शब्द, गीत, प्रेरणा म्हणजेच वंदे मातरम् आहे. हे स्वातंत्र्य गीत, आत्मिक प्रेरणा गीत असून क्रांतीकारकांनाही प्रेरणा देणारे समर गीत असल्याचे प्रतिपादन मंत्री आशिष शेलार यांनी केले. सर्व धर्म, जाती, पंथ येवून गीत गातात, यातून एकत्रित जगण्याची प्रेरणा मिळते. जगाला हेवा वाटावा असे एकमेव गीत असल्याचेही त्यांनी प्रास्ताविकात सांगितले. यावेळी पूर्वा निर्मिती विश्वतर्फे 'वंदे मातरम्'वर पथनाट्य सादर करण्यात आले. सर्व धर्म, भाषांमधून विविध पोषाखात हातात वंदे मातरम् लिहिलेले फलक घेतलेले युवक सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.

कार्यक्रमानंतर दिल्ली येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे 'वंदे मातरम्'चे सामुहिक गायन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे संबोधन झाले.

# तांदुळवाडी शाळेत बालसंसदेची निवडणूक संपन्न, कु.श्रेया काळे मुख्यमंत्री तर चि.सुमित माने उपमुख्यमंत्रीपदी विराजमान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांदुळवाडी येथे बाल संसदेची स्थापना करण्यात आली यावेळी शाळेतील कुमारी श्रेया संदीप काळे हिची मुख्यमंत्री म्हणून तर चिरंजीव सुमित राम माने याची उपमुख्यमंत्रीपदी निवड करण्यात आली. सार्थक धाबेकर, संघरत्न राऊत,आरवी काळे, सोहम डिकले,स इ डिकले,साक्षी भालेकर, सागर काळे यांची आरोग्य मंत्री,शिक्षणमंत्री,क्रिडा मंत्री, स्वच्छता मंत्री, अन्न मंत्री, शिस्त मंत्री म्हणून निवड करण्यात आली. यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मतदानाचा प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी प्रात्यक्षिक म्हणून भारत निवडणूक आयोगाच्या प्रमाणेच विद्यार्थ्यांना निवडणुकीचे फॉर्म भरण्यापासून ते प्रचारापर्यंत आणि त्यानंतर प्रत्यक्ष मतदान व मतमोजणी याचा संपूर्ण अनुभव घेण्याच्या उद्देशाने शाळेच्या वतीने बाल संसद निवडणुकीचे आयोजन करण्यात आले. या निवडणुकीसाठी शाळेतील इयत्ता पहिली



ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी निवडणुकीला उभे राहण्यापासून ते मतदान करण्यापर्यंत सहभाग नोंदवला. चिठ्ठीवर नाव किंवा अनुक्रमांक लिहून मतदानाचा अनुभव घेतला. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर चे हावभाव आणि त्यांचा प्रत्यक्ष सहभाग यामध्ये विद्यार्थ्यात नागरिकत्व आणि त्याबद्दलचा अनुभव दिसून आला. या निवडणुकीसाठी शाळेतील सहशिक्षिका श्रीमती रसिका आगरकर, श्रीमती आशा पवार, मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी श्रीमती सुजाता बनसोडे सहशिक्षक श्री सयाजी शिंदे व मुख्याध्यापक श्री संतोष भोजने यांनी परिश्रम घेतले.

# यश श्री अकॅडमीमध्ये जिल्हास्तरीय नवोदय महासराव परीक्षेला विद्यार्थ्यांनी दिला उदंड प्रतिसाद, रचना सातपुते या विद्यार्थ्याला १०० पैकी १०० गुण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भाळवणी येथील यश श्री अकॅडमी मध्ये इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय नवोदय महासराव परीक्षा रविवार दिनांक नऊ नोव्हेंबर रोजी पार पडली.

सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या मनातील भीती व परीक्षेमध्ये संभाव्य चुका टाळण्यासाठी या महासराव परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. या परीक्षेमध्ये सोलापूर जिल्ह्यातून २०२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.



या परीक्षेमध्ये प्रथम क्रमांक रचना पवन सातपुते १०० पैकी शंभर ग्रुप तृतीय क्रमांक रुद्र विक्रम भोसले १०० पैकी ९८.७५ कुठे क्रमांक आदित्य म्हणजेच शिंदे १०० पैकी ९७.२५ स्वराज्य सागर पिंगळे घोषणा सर्जेराव गायकवाड शंभर पैकी ९६.२५ गुण पाचवा क्रमांक विभाग विराज अंबादास गुजरे व स्वस्तिक सागर खाणे शंभर पैकी ९६.२५ गुण.

परीक्षा झाल्यानंतर लगेचच निकाल जाहीर करण्यात आला या परीक्षेकरिता प्रथम बक्षीस ५५ झिरो एक तृतीय पक्षी ३५ झिरो एक, तृतीय बक्षीस पंचवीस झिरो एक, चतुर्थ पक्षी १५० १, पाचवी बक्षीस १००१ होते

परीक्षा पार पाडण्यासाठी सर्व शिक्षकांनी श्रम घेतली व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण लिगाडे, व आभार प्रदर्शन रणजीत सिंह लोखंडे यांनी मांडले.

# बार्टीने विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमादवारे साताऱ्यात साजरा केला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शाळा प्रवेश दिन!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सातारा/पुणे : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर रोप्यमहोत्सवी शाळा प्रवेश दिनानिमित्त सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट व सामाजिक न्याय खात्याचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली बार्टी मुख्यालय व साताऱ्याच्या प्रतापसिंह भोसले शाळेत विविध प्रबोधनात्मक कार्यक्रम साजरे करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे मार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना खऱ्या अर्थाने अभिवादन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शाळा प्रवेश दिनासंबंधात सर्व दस्तऐवज एकत्रित करून एक संशोधन प्रकल्प राबवण्याचा मानस बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांनी व्यक्त केला आहे. सोबतच लंडन येथील डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या




निवासस्थानाच्या धर्तीवर डॉ. 'आंबेडकर रूम 'शासनाच्या मार्गदर्शनाखाली करण्याचा संकल्प व्यक्त केला. बार्टी संस्थेच्या मध्यमतुन विद्यार्थी दिन संपूर्ण राज्यामध्ये समतादुत विभागाच्यावतीने मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. त्याचाच भाग म्हणून बार्टी मुख्यालयात व राज्यभर कार्यक्रम घेण्यात आले बार्टीमध्ये झालेल्या कार्यक्रमाला महासंचालक सुनील वारे,यावेळी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी सांगली अध्यक्ष श्रीमती सरिता नरके, बार्टीचे निबंधक विशाल लोंढे, विभाग प्रमुख अनिल कारंडे, मारुती बोरकर, वृषाली शिंदे नितीन चव्हाण व बार्टीतील अधिकारी -कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती वैशाली खांडेकर व आभार प्रकल्प व्यवथापक सुमेध थोरात यांनी मानले.

सातारा येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग , शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ रोजी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश दिन विद्यार्थी दिन म्हणून छत्रपती प्रताप सिंह हायस्कूल जुना राजवाडा, सातारा येथे साजरा करण्यात आला. याप्रसंगी साताऱ्याचे अतिरिक्त जिल्हाधिकारी मल्लिकार्जुन माने , जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गावडे, जिपचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी घुले, परिविक्षाधीन मुख्याधिकारी प्रज्ञाशील वाघमारे, महिला व बालविकास अधिकार ठोंबरे, शिक्षणाधिकारी आणि नायकवडी, शिक्षण अधिकारी धनंजय चोपडे, गटशिक्षणाधिकारी रवींद्र खंदारे समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सुनील जाधव, बार्टीचे विभागप्रमुख डॉ बबन जोगदंड, छत्रपती प्रतापसिंह हायस्कूल साताऱ्याचे मुख्याध्यापक देशमाने, पत्रकार अरुण जावळे, बार्टीचे रामदास लोखंडे आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थी दिनानिमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकला.

बार्टीच्यावतीने सवलतीच्या दरात डॉ बाबासाहेब आंबेडकर व इतर महापुरुषांचे मौल्यवान ग्रंथ, पुस्तके बुक स्टॉलवर उपलब्ध करून देण्यात आली होती .भीम अनुयायी व नागरिकांनी मोठ्या प्रमाणात ग्रंथसंपदा खरेदी करून महामानवास अभिवादन केले. विद्यार्थी दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी समता रॅली द्वारे संविधानाच्या सामाजिक समतेच्या मूल्यांचा नाम फलकाद्वारे संदेश दिला. या रॅलीत मोठ्या संख्येने विद्यार्थी, विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक सहभागी झाले होते. तसेच कविता बाबासाहेबांच्या या प्रबोधनात्मक काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रा. रमणी बबीता आकाश, नितीन चंदनशिवे ,प्रा. सुमित गुणवंत, बबन सरोदे, रमेश बुरबुरे, संदेश शालिनी संभाजी कर्डक, गजानन गावंडे, सुदेश जगताप, आकाश आप्पा सोनवणे यांनी सहभाग या नामवंत कवींनी यात सहभाग घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला प्रबोधनात्मक व काव्यातून वंदन केले. याप्रसंगी संपूर्ण राज्यातून आलेल्या अनुयायांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून बार्टीच्या या उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थी दिन यशस्वी होण्यासाठी समतादुत विभागाचे प्रकल्प अधिकारी दिलीप वसावे यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# श्री. विठ्ठल रूक्मिणी मातेची प्रक्षाळपुजा संपन्न

## श्री.विठ्ठलाची व श्री.रूक्मिणी मातेची प्रक्षाळपुजा अनुक्रमे मंदिर समिती सदस्या ॲड. माधवी निगडे व शकुंतला नडगिरे यांच्या हस्ते संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : कार्तिकी एकादशी रविवार, दिनांक २ नोव्हेंबर रोजी संपन्न झाली. दरवर्षी यात्रेला भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता, चांगला महुर्त व दिवस पाहून श्रींचा पलंग काढून भाविकांना २४ तास दर्शन उपलब्ध करून देण्यात येते. त्यानुसार दि. २६ ऑक्टोबर रोजी श्रींचा पलंग परंपरेनुसार काढण्यात आला होता व श्री विठ्ठलास लोड व श्री रूक्मिणीमातेस तक्या देण्यात आला होता. त्यामुळे काकडा आरती, पोशाख, धुपारती, शेजारती इत्यादी राजोपचार प्रक्षाळपुजेपर्यंत बंद ठेवून भाविकांना जास्तीत जास्त वेळ दर्शन उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी सांगितले.







आज रविवार, दि. ०९ नोव्हेंबर रोजी मुहूर्तानुसार श्री.विठ्ठलाची व श्री.रूक्मिणी मातेची प्रक्षाळपुजा अनुक्रमे मंदिर समिती सदस्या ॲड. माधवीताई निगडे व शकुंतलाताई नडगिरे यांच्या हस्ते संपन्न झाली. सदर पुजेच्या सुरवातीला प्र. व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत व लेखाधिकारी मुकेश अनेचा यांच्या हस्ते श्रींस पहिले स्नान घालण्यात आले.

तसेच श्री. विठ्ठलास सोने मुकुट, नाम निळाचा, कौस्तुभ मणी, दंड पेट्या जोड मोठा, हिऱ्याचा कंगण जोड, मोत्याचा तुरा, मोत्याची कंठी २ पदरी, मोत्याची कंठी १ पदरी पदकास मोती, मारवाडी पेट्याचा मोत्याचा हार, मस्त्य जोड, लक्ष्मी पदकासह लॉकेट, तुळशीच माळ १ पदरी, शिरपेच लहान १० लोलक असलेला, शिरपेच मोठा २ लोलक असलेला, तोडे जोड, जवेची माळ २ पदरी, एकदाणी इत्यादि अलंकार परिधान करणत्यात आलेले आहेत.

तसेच रुक्मिणी मातेस सोने मुकुट, वाक्य जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमानी पदक, लक्ष्मीहार, जवेच्या माळा, मोहरांची माळ, पुतळ्याची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

याशिवाय, देवाचा शिणवटा/थकवा घालविण्यासाठी आर्युवेदीक काढा श्रीस नैवेद्य म्हणून रात्री शेजारती वेळी दाखविण्यात येणार आहे. आजपासून श्री. विठ्ठलास व श्री.रूक्मिणी मातेस पहाटे होण-ारी काकडा आरती, नित्यपुजा, महानैवेद्य, पोषाख, धुपारती व शेजार-ती इत्यादी राजोपचार सुरू करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

## २४ तास दर्शनाचा विठ्ठल भक्तांनी घेतला लाभ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


पंढरपूर : श्री क्षेत्र पंढरपूर येथे कार्तिकी यात्रा २०२५ यशस्वीरित्या संपन्न झाली. या यात्रेदरम्यान श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या वतीने भाविकांसाठी २४ तास दर्शन व्यवस्था सुरू ठेवण्यात आली होती, ज्याचा लाखो वारकऱ्यांनी लाभ घेतला.

आज सकाळी श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेची प्रक्षाळ पूजा पाहिले स्नान विधीपूर्वक संपन्न झाले.

या स्नानवेळी प्रभारी व्यवस्थापक श्री पृथ्वीराज राऊत, लेखाधिकारी श्री मुकेश आनेचा, आस्थापना विभाग प्रमुख श्री राजेंद्र सुभेदार आणि नित्य उपचार विभाग प्रमुख श्री संजय कोकिळ उप-स्थित होते.

## कार्तिकी यात्रा: प्रक्षाळपूजेनिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आकर्षक फुलांची सजावट





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : प्रक्षाळपूजे निमित्त आज (रविवार) श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात व गाभाऱ्यात विविध फुलांची आकर्षक सजावट करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे प्र. व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली.

सजावटीमुळे मुळे श्रींचा गाभारा मनमोहक व आकर्षक दिसत आहे. यासाठी पिवळा गोंडा २०० किलो , लाल गोंडा २०० किलो, पांढरी शेवंती २०० किलो, अशोक पाला १०० लडी , कलर गुलाब ३०० बंडल , ओर्केट ४० बंडल, अँथेरियम १०० काडी, शेवंती १५०० काडी, साँग २५, ड्रेस ना २५, टेबल पॉम २५, रामबाण ४० बंडल, मोच्या २० बंडल, कारनेशन १५० बंडल इत्यादी दोन टन फुलाचा वापर करण्यात आला आहे.

सदरची सजावट विठ्ठल भक्त अमोल शेरे, पुणे यांनी सेवाभावी तत्त्वावर मोफत केली आहे.

## वंचित बहुजन आघाडीच्या तुळजापूर तालुकाध्यक्षपदी गोविंद भंडारे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनिधी : श्रद्धेय अँड.बाळासाहेब आंबेडकर तथा प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालीलं वंचित बहुजन आघाडीच्या तुळजा-पूर तालुका अध्यक्षपदी बोरगाव (तुपाचे)येथील निष्ठावंत कार्यकर्ते गोविंद हैबती भंडारे यांची निवड करण्यात आली आहे.



गोविंद भंडारे हे आंबेडकरी चळवळीतील युवा कार्यकर्ते असून वंचित बहुजन आघाडीच्या स्थापनेपासून ते आजतागायत श्रद्धेय ड. बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली एकनिष्ठ राहून सामाजिक,राजकिय व धम्मा कार्यात ते सक्रिय असून त्यांनी आतापर्यंत वंचित बहुजन आघाडी मध्ये यापूर्वी तुळजा-पूर तालुका महासचिव म्हणून ही काम पाहिलेले आहे तसेच धाराशिव जिल्हा युवा आघाडीचे प्रवक्ते म्हणूनही त्यांनी काम केलं आहे.त्यांच्या या एकनिष्ठ व प्रामाणिकपणे करत असलेल्या कार्याची दखल घेऊन पक्ष श्रेष्ठीने त्यांची नुकतंच वंचित बहुजन आघाडीच्या तुळजापूर तालुका अध्यक्षपदी निवड केली आहे त्यांच्या या सार्थ निवडीबद्दल मित्र परिवारामध्ये सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

## ऋषितुल्य व्यक्तिमत्व श्री मलप्पा मामा निरोळी यांचा वाढदिवस देवस्थान ट्रस्टतर्फे उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/ता. अक्कलकोट : धार्मिक, सहकार, शैक्षणिक व सामाजिक अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करीत बहुआयामी ठसा उमटवणारे ऋषितुल्य व्यक्तिमत्व श्री परमेश्वर देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त आदरणीय मलप्पा मामा बसवणप्पा निरोळी (सावकार) यांचा ८३ वा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी श्री परमेश्वर देवस्थान ट्रस्ट तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष श्री सिद्धाराम बटगेरी होते. यावेळी बसवराज धड्डे, नागप्पा घोळसगाव, शिवलिंगप्पा दुर्गे, शिवानंद बाबा, गुरुनाथ खरा-डे, शैलेश चितली, धड्डे साहेब यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

मलप्पा मामा यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजसेवा, शिक्षणविस्तार व धार्मिक कार्यासाठी समर्पित केले आहे. त्यांच्या कार्याचा व सेवाभावाचा गौरव सर्व उपस्थितांनी केला. या निमित्ताने गावकऱ्यांनीही मन:पूर्वक शुभेच्छा व्यक्त करत त्यांच्याबद्दल आदराची भावना व्यक्त केली.

कार्यक्रमानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांना पुष्प-हार व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. शेवटी सर्वांच्या शुभेच्छांच्या गजरात वाढदिवसाचा सोहळा अत्यंत आनंदमय वाता-वरणात पार पडला.

# मुंबई जिल्हा तायक्कोंदो कॅडेट आणि सिनिअर चॅम्पियनशिप स्पर्धा संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज :मुंबईतील गुरुनानक खालसा कॉलेज, माटुंगा मुंबई येथे दिनांक ९ नोव्हेंबर २०२५ रोजी १४ वी क्योरुगी आणि ६ वी पूम्से मुंबई जिल्हा तायक्कोंदो चॅम्पियनशिप २०२५-२६ उत्साहपूर्ण वाता-वरणात पार पडली. ही स्पर्धा तायक्कांडो असोसिएशन, मुंबई या जिल्ह्याच्या अधिकृत संघटनेतर्फे भव्य प्रमाणात आयोजित करण्यात आली होती. या चॅम्पियनशिपमध्ये कॅडेट व सिनिअर या दोन वयोगटांत क्योरुगी आणि पूम्से अशा दोन प्रमुख गटांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. संपूर्ण स्पर्धा मुंबई जिल्हा तायक्कोंदो संघटनेच्या समितीच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. स्पर्धेचे रेफरी इन्चार्ज निशांत शिंदे यांनी संपूर्ण स्पर्धेचे संचालन पार पाडले. यावेळी संघटनाचे सचिव विजय कांबळे तसेच जयेश वेल्हाळ, संतोष वाळुंज, राजेश मुरव आणि ओमकार पाटील यांनी मुंबई जिल्ह्याच्या अधिकृत संघाची घोषणा केली.

**राज्यस्तरीय स्पर्धेसाठी मुंबई जिल्हा सज्ज**

मुंबई जिल्ह्याचा निवड झा-लेला संघ १३ ते १४ नोव्हेंबर २०२५ रोजी साई सिल्व्हर लान्स, शिर्डी (जि. अहमदनगर) येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कॅडेट तायक्कोंदो स्पर्धेत सहभाग नोंदवणार आहे. संघ व्यवस्थापक: प्रिती देब, पूम्से प्रशिक्षक: यश दळवी, पूम्से टीम मॅनेजर: प्रिती देब हे सर्वजण मुंबई जिल्ह्या-चे अधिकृत प्रतिनिधी म्हणून कार्य पार पाडणार आहेत. या चॅम्पियनशिपमध्ये पूम्से इव्हेंटमध्ये सिद्धकला तायक्कोंदो अॅकॅडमीने प्रथम क्रमांक पटकावला.

## ॲड. आण्णाराव पाटील यांना दिले ऋणनिर्देश पत्र



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर/प्रतिनीधी : लातूर जिल्ह्याचे अभ्यासू नेतृत्व व महाराष्ट्र गोवा राज्याचे विधी मंडळाचे अध्यक्ष ड अण्णाराव पाटील हे १९ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन या सामाजिक संघटनेच्या प्रतिवर्षी प्रमाणे याहीवर्षी गोरव कर्तव्याचा -सत्कार समाजसेवकांचा या पुरस्कार वितरण सोहळ्यात कार्यक्रमाचे अध्यक्ष व मुख्य मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.व आपल्या शुभहस्ते पुरस्काराचे वितरण केले.तसेच आपल्या वैचारिक शैलीतून उपस्थितांना मार्गदर्शन केले.यासाठी असोसिएशन चे संस्थापक सचिव सुफी सय्यद शमशोद्दीन, लातूर जिल्हा संपर्कप्रमुख आकाश कांबळे, पत्रकार संतोष सोनवणे यांनी ऋणनिर्देश पत्र देऊन व पुष्पहार घालून आदरणीय साहेबांचा त्यांच्या निवासस्थानी सत्कार केला.


**अपघातांना देतेय निमंत्रण**

**अबाल-वृद्धांचा प्रवासादरम्यान गुदमरतोय श्वास**

# तळवली चौकी, वडपा, गंगाराम पाडा परिसरात धुळीमुळे नागरिक त्रस्त; नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : मुंबई-नाशिक महामार्गावरील तळवली चौकी, वडपा आणि गंगाराम पाडा या भागांत सध्या महामार्गाच्या दुरुस्तीची कामे सुरू आहेत. या कामांदरम्यान रस्त्याच्या कडेला खोदलेली व साचवून ठेवलेली माती, तसेच अपूर्ण राहिलेल्या खड्ड्यांमुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर धूळ उडत आहे. परिणामी स्थानिक नागरिक आणि प्रवाशांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून, नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. दुपारच्या वेळी विशेषतः ट्रक, कंटेनर आणि इतर वाहनांच्या वर्दळीमुळे धूळ हवेत मिसळते आणि संपूर्ण परिसर धुकट दिसू लागतो. ही धूळ घरात, दुकानात आणि अन्नपदार्थांमध्ये साचत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. गेल्या काही दिवसांपासून रस्त्यावरील धूळ इतकी वाढली आहे की, मुलांना आणि वृद्धांना श्वास घेणे अवघड झाले आहे. अनेकांना खोकला, दमा, सर्दी आणि छातीत जळजळ होण्याच्या तक्रारी निर्माण झाल्या आहेत. रस्त्याचे काम सुरू झाले हे स्वागतार्ह आहे, पण त्याचवेळी धूळ नियंत्रणासाठी टँकरने नियमित पाणी मारावे. अन्यथा हे काम नागरिकांसाठी आरोग्य धोक्याचे ठरेल.



> **धुळीमुळे आणि धुक्यामुळे सर्दी-खोकला तसेच श्वासाचे त्रास वाढले आहेत. रुग्णसंख्येत वाढ दिसून येत आहे.**
> **- डॉ. निखिल जोगळेकर, पडघा प्राथमिक आरोग्य केंद्र वैद्यकीय अधिकारी)**

असे स्थानिक नागरिकांनी सांगितले. रस्त्याच्या कडेला साचवून ठेवलेल्या मातीकडे दुर्लक्ष झाल्याने वाऱ्याने ती उडून परिसरात पसरण्याचे प्रकार सतत दिसत आहेत. धुळीमुळे दुपारच्या सुमारास वातावरण ढगाळ झाल्यासारखे दिसते आणि दृष्टीक्षेपात अडथळा निर्माण होतो. ही परिस्थिती वाहतूक आणि पादचाऱ्यांसाठीही धोकादायक ठरत आहे. आरोग्य विभागानेही धुळीमुळे नागरिकांमध्ये आजार वाढल्याचे मान्य केले आहे.

दरम्यान, नागरिकांनी संबंधित कामकाज विभागास तातडीने पाणी फवारणीसाठी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. तसेच प्रलंबित रस्त्यांची कामे लवकर पूर्ण करून परिसरातील धूळकण नियंत्रणात आणा-वेत, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# पारधेवाडीच्या लाडक्या बहिणींचा स्तुत्य उपक्रम; लाडकी बहिण योजनेचा एक हप्ता विठ्ठल रुक्मिणी मंदीराच्या बांधकामासाठी

## औसा तालुक्यातील पारधेवाडीत लाडक्या बहिणींचा नवा उपक्रम लाडक्या बहिणीनी एक महिन्याचा हप्ता विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या बांधकामासाठी दिला; आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे भूमिपूजन संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधि/अमर जाधव :

औसा :- विठ्ठल-रुक्मिणी भक्तीच्या व्यापक प्रभावामुळे महाराष्ट्रातील अनेक समाजगट, संस्था, आणि संघटना मंदिर बांधकाम, विकास आणि सेवाकार्यात सक्रियपणे सहभाग घेतात. याची साक्ष पारधेवाडी येथून पडली, जिथे 'लाडक्या बहिणीनेॠ विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या बांधकामासाठी एका महिन्याचा हप्ता दिला.



या प्रक्रियेत आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते बुधवारी ( ता. ५ ) मंदिराचे भूमिपूजन सोहळा संपन्न झाला. आमदार अभिमन्यू पवार यांचा सत्कार वारकरी संप्रदाय च्या वतीने जयहिंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला.

हा नवा उपक्रम गावातील सामाजिकांच्या आणि महिलांच्या सहकार्याचे उदाहरण ठरला.

लाडक्या बहिणी ची ही पहिली खेरीज रचनात्मक सामाजिक गुंतवणूक गावातील महिलांनी आपापल्या स्वातंत्र्यानं, व्यवस्थित पैशाचा हप्ता देऊन सुरू केली आहे. या लाडक्या बहिणी म्हणतात, आपल्या मुलांसाठी नीट शिक्षण, सुखमय जीवन मिळवून द्यायचं आहे, तसंच संस्काराचं महान-त्यासाठी विठ्ठल-रुक्मिणीची भक्ती, आणि मंदिर निर्माण हा एक महत्त्वाचा मार्ग आहे. आम्ही ते करत आहोत. त्यांच्या या भावनेतून गावकऱ्यांचे एकजुटीचे चित्र पुढे आले आहे.

याच सदर प्रसंगी, आमदार अभिमन्यू पवार यांनी मंदिराच्या भूमिपूजनाची कामगिरी सांभाळली होती. त्यांनी सांगितले की, लाडक्या बहिणींचा सहभाग आणि त्यांच्या मनातील विठ्ठल-रुक्मिणींची भक्ती हे पाहून नेहमी आनंद वाटतो. अशा प्रकारच्या सामाजिक आधाराबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो. हा उपक्रम हा केवळ मंदिर बांधकामापुरता मर्यादित नाही, तर नव्याने उभारणाऱ्या समाजाचे प्रतीक आहे. त्यांच्या म्हणण्यातून, अशा प्रकारच्या उपक्रमास राजकीय, सामाजिक, आणि सांस्कृतिक महत्त्व आहे हे स्पष्ट होते.

हे मंदिर नव्याने बांधलं जात असून, ते पारधेवाडीतील सांस्कृतिक, सामाजिक आणि आस्थेचे एकाधार ठरणार आहे. मंदिराच्या उभारणीसाठी गावातील सर्व स्तरांतील जनतेच्या हजारों रुपयांच्या आर्थिक सहकार्याच्या ललाटावर हा उपक्रम पहिला ठरणार असल्यानं, गावातील अनेक अन्य प्रतिष्ठानांनीही अशा प्रकारच्या प्रयत्नांना ओंजळ घातली आहे.

श्री क्षेत्र पंढरपुर येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या माहात्म्यावरूनच ही भावना प्रबल होते. महाराष्ट्रातील उदंड विठ्ठल-रुक्मिणी मंदिरांची ठाणी आहेत, त्यांचा नित्य, डेकोरेशन, आणि भव्यत्व यांना पूर्ण राजकीय आणि समाजातून आधार मिळतो. या परंपरेला जोडून, पारधेवाडीतील नवीन मंदिर बांधकामात सहभाग हा सर्वभूत पातळीवर सामाजिक एकात्मतेचे एकतारदर्शी उदाहरण आहे.

उद्धृत प्रतिसाद आमदार अभिमन्यू पवार:

मंदिर निर्माणासाठी महिलांचा हप्ता हा केवळ उद्योग नव्हे तर आदर्श समाजाचा उदात्त आदर्श आहे. पारधेवाडीतील लाडक्या बहिणींनी दिलेली मिसाल इतर महिलांनाही प्रेरणा देणारी आहे.

आमच्या परंपरा, संस्कृती आणि आधाराच्या विठ्ठल-रुक्मिणीच्या मंदिरासाठी हप्ता गोळा करण्याचा निर्णय समवेत घेतला. प्रत्येक बहिणीने मनापासून सहभागी व्हायचे ठरवलं.

गावातील सर्व स्तरांच्या उपस्थितीत मंदिर निर्मितीची कामगिरी सुरू असल्याची प्रतिसादाबरोबल आसपासच्या गावांमध्येही अशा उपक्रमांची चर्चा चालू आहे. परिषदेत ग्रामपंचायत प्रमुख, मंदिर समिती, आणि विकास यंत्रणेचे सहकार्य लागेल, असेही ठरले आहे.

हे मंदिर उभारताना श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या पूजनपाठ, वारकरी संस्कृती, आणि धार्मिक एकात्मतेचे आदर्श स्थापत असेल. तसेच, गावकऱ्यांसमोर एक आदर्श, सर्वांनी समजुत घेतलेला उपक्रम आहे. यामुळे पुढील काळात प्रतिकूलतेला लढून, गावाची नागरीक, सांस्कृतिक व भविष्यात्मक ओळख मजबूत होणार आहे.

महाराष्ट्रात विठ्ठल-रुक्मिणी भक्ती ही केवळ धार्मिक नसून, सामाजिक, आर्थिक, आणि सांस्कृतिक प्रवाहाचा पाया आहे. पारधेवाडीतील या प्रकल्पामुळे गावाला नव्या पातळीवर ओळख मिळत आहे.

सरपंच हनुमंत जाधव, यांनी पारधेवाडीत ही संकल्पना राबवून पूर्ण महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींनी आदर्श घ्यावा अशी संकल्पना राबवली आहे.

यावेळी सरपंच हणमंत जाधव, तांबरवाडीचे सरपंच राधाकृष्ण जाधव, युवराज बिराजदार, माजी जिल्हा परिषद सदस्य बंकट पाटील, माजी सरपंच गणपती कानडे, संचालक गोविंद भोसले, भागवत जगताप, ग्राम पंचायत सदस्य, सौ.मिनाबाई साखरे, मंगलताई साखरे, तंटामुक्ती अध्यक्ष विश्वास साखरे, यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आमदार पवार म्हणाले लाडक्या बहिणींचा सहभाग आणि त्यांच्या मनातील विठ्ठल-रुक्मिणींची भक्ती पाहून आनंद वाटला. अशा प्रकारच्या सामाजिक आधाराबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो.

यावेळी गावातील वारकरी संप्रदाय महिला व पुरुष भजनी मंडळ व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भरत खोत यांनी १७ वर्षे देशसेवा करून सेवानिवृत्त झाल्याबद्दल वर्गमित्र २००४ तर्फे सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ सुपुत्र भरत तानाजी खोत हे सन २००८ यावर्षी सैन्य दलात भरती झाले. यांचे ट्रेनिंग मराठा लाईट इन्फंट्री रेजिमेंटल सेंटर बेळगाव या ठिकाणी ९ महिने प्रशिक्षण पूर्ण केले.



प्रशिक्षण नंतर प्रथम त्यांची अरुणाचल प्रदेश राज्यात बदली झाली.

तसेच पुणे, सिक्कीम ,जम्मू काश्मीर, पाकिस्तान बॉर्डर, राजस्थान, गुजरात,बेळगाव येथे आपली देश सेवा बजावली.

नायक या पदावरून ते १७ वर्षे सेवा करून सेवानिवृत्त झाले. घरची परिस्थिती नाजूक असताना सुद्धा परिस्थितीवर मात करत सैन्य दलात भरती झाले.

३१ ऑक्टोबर २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले. गावामध्ये यांचे जंगी स्वागत करण्यात आले. गावातील सैनिक असोसिएशन यांच्यातर्फे मोठ्या उत्साहाने गावातून जंगी मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी वर्गमित्र २००४, सैनिक असोसिएशनचे सर्व आजी-माजी सैनिक, समस्त गावकरी, मित्रमंडळी, पाहुणे, या कार्यक्रमाला मोठ्या उत्साहात सहभागी होते.

# नळदुर्ग नगरपरिषद निवडणूकीत नगराध्यक्ष पदासाठी भाजपाकडून सुनील उकंडे निवडणूक लढविणार ?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वादगरी/एस.के. गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्षपदासाठी भाजपाकडून उमेदवारी मिळावी यासाठी भोई समाज संघटनेचे अध्यक्ष सुनील उकंडे हे प्रयत्नशील असून भाजपा पक्ष सृष्टीने संधी दिल्यास नगराध्यक्ष पदाची निवडणूक संपूर्ण ताकतीनिशी लढविणार असल्याचे सेवानिवृत्त शिक्षक तथा भोई समाज संघटनेचे अध्यक्ष सुनील उकंडे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

भारतीय जनता पार्टीने उमेदवारी दिली तर संधीचं सोनं करणार अशी प्रतिक्रिया सुनील उकंडे यांनी बोलताना दिली .



वास्तविक पाहता नळदुर्ग शहराच्या जडणघडणीमध्ये भोई समाजाचा फार मोठा सहभाग असून भोई समाजातील कै.प्रभाकर पुदाले सलग २५ वर्ष नळदुर्ग नगर परिषदेत नगराध्यक्ष म्हणून जनतेची सेवा केली.तसेत कै.बाबुराव पुदाले यांनी विविध सेवा सोसायटी च्या माध्यमातून पंचवीस वर्ष शेतकऱ्यांच्या समस्याच्याची सोडवणूक केली आहे.तर किसनराव दासकर यांनी दूध संघाचे चेअरमन होते तसेच माधवराव पुदाले,दत्तात्रय दासकर आदी मंदळी सातत्याने जनतेच्या सेवेत होती.त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत सुनील उकंडे हे सामाजिक कार्यात सक्रिय आहेत.भाजपाने संधी दिल्यास आमदार राणाजगदीजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नळदुर्ग शहराचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न करणार असून नळदुर्ग शहराचा विकास हाच माझा अजेंटा असल्याची प्रतिक्रीया इच्छुक उमेदवार सुनिल उकंडे यानी माध्यमांशी बोलताना दिली.

नळदुर्ग शहरातील जनतेच्या सेवेसाठी भोई समाजाचे मोठा योगदान आहे तरी भारतीय जनता पक्षाने नळदुर्ग नगर परिषद निवडणूकीत नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढविण्यासाठी भाजपाकडून उमेदवारी द्यावी अशी मागणी इच्छुक उमेदवार सुनील उकंडे सह जनतेतून होत आहे.इच्छुक उमेदवार सुनील उकंडे हे शहरातील सामाजिक सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय असून त्यांनी विविध कार्यक्रमांमधून आपली कार्यक्षम नेतृत्व शैली सिद्ध केली आहे. भोई समाजाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी अनेक युवकांना संघटित ' करून रामनवमी , हनुमान जयंती , नवरात्रोत्सव आदी सह धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमात त्यांचा नेहमीच पुढाकार असतो.

# खा. शिवाजीराव काळगे यांचे ऋणनिर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर/प्रतिनीधी : महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन (महाराष्ट्र राज्य)या सामाजिक संघटनेच्या वतीने प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण करण्यात आले गौरव कर्तव्याचा, सत्कार समाजसेवकांचा हा कार्यक्रम डॉ भालचंद्र ब्लड बँक लातूर येथे या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून पुरस्काराचे वितरण केले.व पुरस्कार कर्त्यांना मार्गदर्शन केले, त्याबद्दल त्यांच्या कार्यालयात जाऊन त्यांचा आज रोजी दि.८नोव्हेंबर रोजी ऋणनिर्देश पत्र देऊन सत्कार करण्यात आला. त्यावेळी असोसिएशन चे संस्थापक सचिव सुफी सय्यद शमशोद्दीन, पत्रकार संतोष सोनवणे, संपर्क प्रमुख आकाश कांबळे उपस्थित होते.



# नवनाथ बाबा अहिरे फाउंडेशन आणि सह्याद्री ग्रामीण क्रिकेट असोसिएशन यांच्या माध्यमातून पंढरपूर येथे गेलेल्या वारकऱ्यांना टोल माफी व पाणी बॉटल वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई,(केतन भोज);खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले तसेच महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि श्रीमंत छत्रपती संभाजी राजे यांच्या मार्गदर्शनाखाली व अमर दादा पाटील व सह्याद्री ग्रामीण क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत भाऊ मोरे तसेच युवा कीर्तनकार हभप श्री.बाळकृष्ण महाराज आहिरे यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली नवनाथ बाबा आहिरे फाऊंडेशन तसेच सह्याद्री ग्रामीण क्रिकेट असोसिएशन यांच्या माध्यमातून कार्तिकी वारी निमित्ताने तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे दर्शनासाठी जाण्या व येण्यासाठी टोल फ्री करून देण्यात आले होते.तसेच सर्व वारकऱ्यांना पाणी बॉटल वाटप करण्यात आले.मुंबई मधील उद्योजक राम रिंगे,महासेना क्रांतिकारी संघटना भारत व प्रमोद केशव (महासेना वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख)आणि नवनाथ आहिरे फाऊंडेशनचे पदाधिकारी निशांत (बंटीभाऊ) पांगे,गिरीष भाऊ नार्वेकर,विक्की आहिरे यांच्या वतीने यंदाची




कार्तिकी एकादशी वारी सुखरूप झाली.असे मत यावेळी आलेल्या वारकरी बांधवांनी व्यक्त केले.याशिवाय काही ठिकाणी अडचणी निर्माण झाल्या असतील परंतु आम्हाला आपल्या वारकरी संप्रदायाची सेवा करण्याची संधी मिळाली हे आमचे भाग्य आहे ज्या काही अडचणी निर्माण झाल्या त्याबद्दल मी आपली क्षमा मागतो पुढे असे होणार नाही याची काळजी घेऊन पुढील वर्षी आपली सेवा कशी अधिकाधिक योग्यप्रकारे सेवा करता येईल याची काळजी घेतली जाईल,असे ही यावेळी सेवेकरी नवनाथ बाबा आहिरे यांनी सांगितले.

## जास्त शुल्क आकारणी, निकृष्ट सेवा आणि कर्मचाऱ्यांकडून गैरवर्तन होत असल्याचा गंभीर आरोप

# ११ नोव्हेंबरपासून डॉक्टरांचा आमरण उपोषणाचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर, केतन भोजः मुंबईतील रुग्णालये आणि खाजगी दवाखान्यांमधून निर्माण होणारा जैवरासायनिक कचरा संकलनाचे काम राज्य शासनाने एस एम एस इंव्होक्लीन प्रा.लि. या कंपनीकडे दिलेले आहे. मात्र या कंपनीकडून डॉक्टरांकडून शासन-निर्धारित दरांपेक्षा जास्त शुल्क आकारणी, निकृष्ट सेवा आणि कर्मचाऱ्यांकडून गैरवर्तन होत असल्याचा गंभीर आरोप नॅशनल इंटिग्रेटेड डॉक्टर्स असोसिएशन तर्फे करण्यात आला आहे. या संदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सविस्तर निवेदन देण्यात आले असून ११ नोव्हेंबर २०२५ पासून मंत्रालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे. शासनाने निश्चित केलेले जैवरासायनिक कचरा संकलनाचे दर न पाळता




कंपनीकडून डॉक्टरांकडून अतिरिक्त शुल्क आकारणी केली जात असल्याचा आरोप डॉक्टरांकडून केला जात आहे.कंपनीकडून कचरा उचलण्यात अनियमितता दाखवली जात असून काही दवाखान्यांत कचरा अनेक दिवस पडून राहतो असे असोसिएशनचे कार्याध्यक्ष डॉ योगेश भालेराव यांनी सांगितले.तर कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून डॉक्टरांना धमकावणे,उद्धट वर्तन आणि सेटलमेंटच्या नावाखाली लाच मागण्याचे प्रकार घडत असल्याचे असोसिएशन ने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. कंपनीकडे बृहन्मुंबई महानगरपालिका व शासनाकडून मिळालेल्या अधिकारांचा गैरवापर होत असल्याचा आरोप डॉक्टरांमध्ये वाढत आहे.अतिरिक्त व गैरकायदेशीर शुल्क परत न केल्यास मोठा भ्रष्टाचार उघडकीस येण्याची शक्यता असल्याचे असोसिएशनचे म्हणणे आहेकंपनीचे संचालक सौरभ शर्मा यांनी चर्चेत सुधारणा करण्याचे आश्वासन दिले असले तरी ते आजतागायत अमलात आणले गेलेले नाही.

> डॉ. अमोल आंबेकर ( अध्यक्ष , नॅशनल इंटिग्रेटेड डॉक्टर्स असोसिएशन ) : डॉक्टर वर्गाची अनेक वर्षे फसवणूक होत आहे. जर त्वरित कार्यवाही झाली नाही, तर ११ नोव्हेंबर २०२५ रोजी मंत्रालयासमोर आमरण उपोषण करू

**डॉक्टर संघटनेच्या पाच ठोस मागण्या**

एस एम एस इन्व्होक्लीन प्रा . लि.कंपनीच्या कामकाजाची सखोल चौकशी झाली पाहिजे, डॉक्टरांकडून केलेली अवाजवी शुल्क आकारणी तात्काळ परत करावी , मुंबईसाठी नवीन, पारदर्शक व उत्तरदायी जैवरासायनिक कचरा व्यवस्थापन प्रणाली सुरू करण्यात यावी, सदर कंपनीला दिलेले कंत्राट रद्द करणे आणि नवीन निविदा प्रक्रिया (टेंडर) लागू करावे